आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
०४ मे २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- युरोपशी भागीदारी करण्यात भारताला रस असल्याचं परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांचं प्रतिपादन

- भारत निवडणूक आयोग लवकरच बहुपयोगी मोबाईल ॲप लाँच करणार

- देशभरातल्या पाच हजार केंद्रांवर आज वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठीच्या नीट चाचणी परीक्षेचं आयोजन

**आणि**

- आध्यात्मिक गुरु आणि योगसाधक बाबा शिवानंद यांचं निधन, प्रधानमंत्र्यांकडून शोक व्यक्त

<><><><><>

युरोपशी भागीदारी करण्यात भारताला रस असल्याचं परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. आर्क्टिक प्रदेशातल्या घडामोडी, जागतिक राजकारण, व्यापार आणि शाश्वततेत आशिया खंडाची वाढती भूमिका लक्षात घेऊन त्यावर साधक-बाधक चर्चा करण्याकरता नवी दिल्लीत आयोजित ‘आर्क्टिक सर्कल इंडिया फोरम २०२५’मध्ये ते आज बोलत होते. युरोपवर बदलाचा दबाव आहे आणि या बदलांमुळे बहुध्रुवीयतेचं वातावरण तयार होत आहे. केवळ जगाला शिकवणूक देऊन स्वत:च्या घरी मात्र, त्या बाबी आचरणात न आणणारे बरेच असले, तरी, भारताला अशांची नाही, तर एका

चांगल्या भागीदाराची गरज आहे, आणि युरोप हा त्याकरता एक चांगला पर्याय असल्याचं त्यांनी सांगितलं.

आर्क्टिक प्रदेशाला स्वतःचं असं जागतिक महत्त्व असून या प्रदेशातला भारताचा सहभाग वाढत असल्याचं सांगून आर्क्टिकमध्ये घडणाऱ्या घडामोडी केवळ भारतासाठी महत्त्वाच्या नसून त्यांचे परिणाम हे संपूर्ण जगावर होणार असल्यानं सरकारनं काही वर्षांपूर्वी भारतानं आर्क्टिक धोरण आणल्याचं जयशंकर यांनी सांगितलं.

<><><><><>

भारत निवडणूक आयोग लवकरच संबंधित भागधारकांसाठी विविध कामांकरता उपयोगी पडेल असं 'ECINET' हे मोबाईल ॲप लाँच करणार आहे. आयोगाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या विविध ४० मोबाईल आणि वेबसाईट ॲप्सचा समावेश या एकाच ॲपमध्ये असेल. या ॲपचा उपयोग मतदार, निवडणूक अधिकारी, राजकीय पक्ष आणि समाजातले इतर विविध संबंधित घटक करू शकतात.

<><><><><>

वेव्हज परिषदेतला स्टार्टअप ॲक्सिलरेटर प्रोग्रॅम वेव्हजएक्स सुमारे १५ स्टार्टअप्ससाठी गुंतवणुक मिळवून देण्याची अपेक्षा असल्याचं IAMAI चे मुख्य विकास अधिकारी संदीप झिंग्रान यांनी म्हटलं आहे. विविध स्टार्टअप्सनी वेव्हजसाठी एकूण एक हजार अर्ज सादर केले होते. त्यापैकी सुमारे ३० स्टार्टअप्सनी वेव्हजमधल्या गुंतवणूकदारांसमोर त्यांचे विचार मांडले आहेत. वेव्हजच्या स्टार्टअप पॅव्हेलियनमध्ये सुमारे ११० स्टार्टअप्सनी त्यांचे विचार मांडले आहेत. त्यांना काही निधी मिळण्याची अपेक्षा आहे. स्टार्टअप गुंतवणूकदार राजेश

जोशी यांनी वेव्हज परिषदेबद्दल आनंद व्यक्त केला आहे. यामुळे स्टार्टअप्सना एकाच ठिकाणी एकत्र येण्यास मदत झाली असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठीची नीट ही चाचणी परीक्षा आज होत आहे. राष्ट्रीय चाचणी संस्था एनटीएच्या वतीनं आज देशातल्या पाच हजार केंद्रावर आणि परदेशातील तेरा केंद्रांमध्ये ही परीक्षा होणार आहे. या परीक्षेसाठी साडेबावीस लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून राज्यात ३५ शहरांमध्ये दोन लाख ७९ हजार विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत.

<><><><><>

उत्तराखंडमधलं चमोली जिल्ह्यात, आज बद्रीनाथ धामची कवाडं विधिवत उघडण्यात आली. यामुळे आता केदारनाथ, गंगोत्री आणि यमुनोत्रीसह चारही धामांची कवाडं भाविकांसाठी उघडण्यात आली आहेत. चारधाम यात्रेसाठी रेल्वे मंत्रालयातर्फे भारत गौरव डिलक्स रेल्वे सुरू करण्यात आली आहे. या रेल्वेनं बद्रीनाथ, जोशीमठ, ऋषिकेश, पुरी, कोणार्क, रामेश्वरम आणि द्वारका तसंच काशी विश्वनाथ, भीमाशंकर आणि त्र्यंबकेश्वर या ठिकाणी प्रवास करता येणार आहे. ही रेल्वे या महिन्याच्या २७ तारखेला दिल्लीच्या सफदरजंग रेल्वे स्थानकावरून सुटून सतरा दिवसात चार धाम आणि इतर धार्मिक स्थळांची यात्रा पूर्ण करणार आहे.

<><><><><>

आध्यात्मिक गुरु आणि योगसाधक बाबा शिवानंद यांचं काल रात्री निधन झालं. ते १२८ वर्षांचे होते. बाबा शिवानंद यांनी योगसाधनेद्वारे केलेल्या समाजसेवेबद्दल त्यांना २०२२ मध्ये पद्मश्रीने सन्मानित करण्यात

आलं होत. प्रकृती खालावल्यामुळे बाबा शिवानंद यांना ३० एप्रिल रोजी वाराणसी इथल्या बनारस हिंदू विद्यापीठाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं होत. तिथेच त्यांनी काल रात्री अखेरचा श्वास घेतला.

बाबा शिवानंदांचा जन्म आताच्या बांग्लादेशमधल्या सिल्हेट जिल्ह्यात १८९६ साली झाला होता, वयाच्या सहाव्या वर्षी आईवडिलांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांना ओंकारानंद यांनी आपल्या छत्रछायेखाली घेतलं आणि पुढे अध्यात्म आणि योगसाधनेची दीक्षा दिली होती.

बाबा शिवानंदांच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. ‘योग आणि साधनेला समर्पित असलेल्या त्यांच्या जीवनातून देशातील अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळत राहील’, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या एक्स वर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही बाबांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. बाबांनी योगसाधनेप्रति दिलेलं योगदान अतुलनीय असल्याचं त्यांनी आपल्या एक्स वर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

सातव्या ‘खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धां’च्या बिहारमध्ये होत असलेल्या आयोजनामुळे राज्यातल्या क्रीडा सुविधांचा विकास होईल आणि गुणवंत खेळाडूंना मोठी संधी मिळेल, असं भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे उप महासंचालक मयांक श्रीवास्तव यांनी म्हटलं आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवणारे भारताचे खेळाडू देखील ‘खेलो इंडिया’ स्पर्धांमधूनच पुढे आले होते असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय आज सकाळी नवी दिल्लीत मेजर ध्यानचंद स्टेडियम मध्ये आयोजित 'फिट इंडिया संडेज ऑन सायकल' या उपक्रमातील विशेष भाग 'सायकलिंग विथ टीचर्स' मध्ये सहभागी झाले होते. लठ्ठपणा कमी करून शारीरिक तंदुरुस्ती वाढवण्यामधील शिक्षक, प्रशिक्षक आणि शैक्षणिक समुपदेशकांच्या भूमिकेचे महत्व अधोरेखित करण्यासाठी हे अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानाची सुरुवात गेल्या वर्षी डिसेम्बरमध्ये झाली होती.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातला सामना कोलकाता इथे दुपारी साडेतीनला सुरु होणार असून पंजाब किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यातला सामना धर्मशाला इथं संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होणार आहे.

चेन्नईत चिन्नास्वामी स्टेडियममध्ये काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघानं चेन्नई सुपर किंग्ज संघाचा दोन धावांनी पराभव केला. या विजयासह रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघ १६ गुणांसह अव्वल स्थानावर पोहोचला आहे.

**<><><><><>**

भारत आणि अंगोलामधले द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी वचनबद्ध असल्याचं अंगोलाचे अध्यक्ष जोआओ मॅन्युएल गोन्साल्व्हेस लॉरेन्झो यांनी म्हटलं आहे. ते आज दिल्लीत भारत-अंगोला बिझनेस

फोरममध्ये बोलत होते. भारत हा जेनेरिक औषधांमध्ये तज्ञ असलेला एक प्रमुख भागीदार असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

जम्मू काश्मीरमधल्या नियंत्रण रेषेवर काल रात्री पाकिस्तानी लष्करानं केलेल्या गोळीबाराला भारतीय लष्कराने चोख प्रत्युत्तर दिल आहे. जम्मू काश्मीरच्या कुपवाडा, बारामुल्ला, पूंछ, राजौरी, मेंढर, नौशेरा, सुंदरबनी आणि अखनूर भागात पाकिस्तानी लष्कराने विनाकारण गोळीबार केल्याचं संरक्षण सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

जर्मनीच्या बव्हेरियातल्या भारतीय समुदायानं पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी काल म्युनिकमध्ये शांततापूर्ण निषेध मोर्चा काढला. सुमारे ७०० लोकांनी या मोर्चात भाग घेतला. जर्मन संसद सदस्य हान्स थेइस आणि म्युनिक सिटी कौन्सिलर डेलिजा बालिदेमाज यांनीही मोर्चात भाग घेतला.

<><><><><>

बांगलादेशच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचं अधिकृत फेसबुक पेज हॅक झाल्याची माहिती या विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानी दिली आहे. या संदर्भातली माहिती आपल्याला काल समजली असून हॅकर्सनं काल दुपारी या पेजचं पूर्ण नियंत्रण मिळवलं. हे पेज पूर्ववत करण्यात येत असून घटनेच्या चौकशीसाठी आवश्यक ती पावलं उचलण्यात येत आहेत. हे फेसबुक पेज पूर्ण दुरूस्त होऊन ते पूर्ववत होईपर्यंत या पेजकडून येणारी माहिती आणि

पोस्टवर विश्वास ठेवू नये, तसंच माहिती शेअर करू नये, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

रोमानियामध्ये आज राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेअकरा वाजता मतदानाला सुरुवात होईल. गेल्या वर्षी झालेल्या निवडणुकीत फसवणूक आणि घोटाळा झाल्याचा निर्णय देत रोमानियाच्या सर्वोच्च न्यायालयानं निवडणुक अवैध ठरवली होती. आजच्या निवडणुकीत AUR पक्षाचे जॉर्ज सिमियन, बुखारेस्टचे महापौर निकुसर डॅन, क्रिन अँटोनेस्कू आणि अपक्ष एलेना लास्कोनी यांच्यासह सात इतर उमेदवार देखील निवडणुकीच्या रिंगणात आहेत. जर कोणत्याही उमेदवाराला ५० टक्क्यांहून अधिक मतं मिळाली नाहीत, तर १८ मे रोजी पुन्हा मतदान होईल.

//<><><><><>//